म. टा. ५-५-१.

**मटा अँकर** उष्माघातामुळे पोलिस सावध; वाहतूक पोलिसांसाठी मार्गदर्शक सूचना

# आजारी, ५५ वर्षांवरील पोलिसांना उन्हात ड्युटी नको !

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

उन्हाचा पारा दिवसेंदिवस नवनवीन विक्रम करीत असताना, मुंबई देखील उन्हाच्या झळांनी अक्षरशः करपून निघत आहे. अशात वाहतूक पोलिस तळपत्या उन्हात आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यामुळे त्यांच्याप्रती माणुसकीच्या भावनेने विचार करतानाच, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वाहतूक पोलिस सावध झाले आहे. ५५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय, तसेच दमा, रक्तदाब, मधुमेह असलेल्या पोलिसांना दुपारी १२ ते सायंकाळी पाच या वेळेत उन्हात ड्युटी न देता त्यांना कार्यालयीन काम दिले जाणार आहे.

मुंबईत प्रचंड उन्हामुळे सामान्यांना घरातून बाहेर पडणे जिकिरीचे झाले आहे. अशा परिस्थितीत कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिस भर उन्हात उभे राहून वाहतुकीचे नियमन करतात. पोलिसांना उष्माघाताचा फटका बसू नये, यासाठी पोलिस सहआयुक्त प्रवीण पडवळ यांनी काही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यात महत्त्वाची म्हणजे ५५ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वयाच्या पोलिसांना; तसेच दमा, रक्तदाब, मधुमेह, इतर दुर्धर आजार असलेल्या पोलिसांना उन्हात काम देऊन नये. अशा पोलिसांना कार्यालयीन काम द्यावे, असे या सूचनांमध्ये नमूद केले आहेत.



**इतर महत्त्वाच्या सूचना**

- वाहतुकीच्या नियमनासाठी तरुण, सशक्त पोलिसांची नियुक्ती करणे
- एका ठिकाणी जोडीने पोलिसांची किंवा सोबत वॉर्डची नेमणूक करावी
- दुपारच्या वेळेस कर्तव्याच्या ठिकाणी स्वच्छ पाण्याच्या बाटलीची व्यवस्था करणे
- उन्हाची दाहकता असल्याने प्रत्येकाने न चुकता टोपी घालावी
- छातीत दुखणे, चक्कर आल्यास तत्काळ जवळच्या रुग्णालयात जावे
- वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कर्तव्यावरील पोलिसांची नियमित माहिती घ्यावी

म. टा. ५.५-१.

# रेल्वेच्या कारवाईला तूर्तास स्थगिती

म. टा. वृत्तसेवा, वसई

रेल्वेच्या जागेत अतिक्रमण केलेल्या घरांवर कारवाई करण्यासाठी जागा रिक्त करण्याच्या नोटिसा रेल्वेने बजावल्या होत्या. त्यामुळे येथील तीन हजार कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ आली होती. फुले-आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीने या कारवाईविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावरील सुनावणीत उच्च न्यायालयाने रेल्वेच्या कारवाईला ४ मेपर्यंत स्थगिती दिली आहे.

विरार पूर्वेकडील अण्णापाडा येथील जागा रेल्वे प्रशासनाची असून या ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. पश्चिम रेल्वे ने घरे रिकामी करण्यासाठी नोटीस बजावली होती. २५ ते २९ एप्रिल दरम्यान ही कारवाई होणार होती. फुले आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीने याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर नुकतीच सुनावणी पार पडली. समितीच्या वतीने वकील दिलीप शिंदे, वरिष्ठ वकील किशोर पाटील तसेच वकील नितीन भोईर यांनी युक्तिवाद केला. यावेळी न्या.जी. एस. पटेल आणि नीला गोखले यांनी संघर्ष समितीची बाजू ऐकून घेतली आणि ४ मेपर्यंत स्थगिती दिली आहे. या लढाईत समाजसेवक प्रसेनजीत इंगळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी न्यायालयीन कारवाईचा सर्व खर्च उचलला, तर माजी नगरसेवक आणि आगरी सेना, प्रहार, शिवसेना शिंदे गट, वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी नागरिकांच्या आंदोलनाला समर्थन दिले होते.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. ५१.४.

# अमली पदार्थांची तस्करी रोखणार

## विरार पोलिसांचा पुढाकार; कारवाईसाठी पथक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** शहरात छुप्या मार्गाने होणारी अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी विरार पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी पोलीस ठाण्यात विशेष पथक नेमून कारवाई केली जाणार आहे.

वसई-विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. त्याचबरोबर अमली पदार्थांची विक्री व तस्करीचे प्रमाणही वाढत आहे. कोकेन, हेरॉईन व इतर अमली पदार्थ यांची छुप्या मार्गाने तस्करी होत असते. अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यात वसईतील तरुणाई अलगद अडकत चालल्याने चिंता व्यक्त होत आहे.

वसई-विरार तसेच नालासोपाऱ्यात अधूनमधून गांजा व इतर अमली पदार्थांसह आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले आहे.

> अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. आता पोलीस ठाण्यातही पथक तयार केले आहे. त्यामुळे अशा प्रकारावर आम्ही लक्ष ठेवून आहोत. - राजेंद्र कांबळे,
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे

अमली पदार्थांचा व्यापार, तस्करी यांना आळा बसावा, यासाठी आयुक्तालयाच्या क्षेत्रात अमली पदार्थविरोधी पथकही नेमण्यात आले आहे.

याशिवाय आता पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातही पथक तयार करण्यात येत आहे. विरार पोलिसांनी यासाठी पुढाकार घेतला असून, पथक तयार करून अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कारवाई सुरू केली जाणार आहे. आतापर्यंत तस्करीविरोधात २० कारवाया केल्या आहेत. यापुढे ही कारवाई अधिकच तीव्र केली जाणार असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

---

# झोपडपट्ट्यांविरोधातील कारवाईला उच्च न्यायालयाची तात्पुरती स्थगिती

## विरारमधील हजारो कुटुंबांना दिलासा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारमधील रेल्वेच्या जागेतील झोपडपट्ट्यांविरोधातील कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे हजारो रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरार पूर्वेतील जीवदानी पाडा, अण्णापाडा, आंबेडकरनगर हा परिसर रेल्वेच्या जागेत आहे. या परिसरात तीन हजारांहून कुटुंबे अनेक वर्षांपासून राहत आहेत. रेल्वेने या नागरिकांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा दिल्या होत्या. घरे रिकामी न केल्यास मंगळवार, २५ एप्रिलपासून कारवाई केली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. यामुळे या परिसरातील नागरिक हवालदिल झाले होते. या संदर्भात फुले आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीने या कारवाईच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावेळी न्यायाधीश न्या. जी. एस. पटेल आणि नीला गोखले यांनी संघर्ष समितीची बाजू ऐकत रेल्वेच्या या कारवाईला तात्पुरती स्थगिती दिली आहे. यामुळे हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी समितीच्या वतीने ॲड. दिलीप शिंदे, ॲड. किशोर पाटील, ॲड. नितीन भोईर यांनी युक्तिवाद केला.

स्थानिक कार्यकर्ते प्रसेनजीत इंगळे, सिद्धार्थ खंदारे, मॅथ्यू वर्गीस, बाळा वंगीरी, सुरेश निर्थी, पतीराम यादव, किट्टू करपते, रोहित यांनी या लढ्यात मोलाचे योगदान दिले. नागरिकांच्या या लढ्याला विविध पक्षांनी पाठिंबा दिला आहे. तूर्तास स्थगिती मिळाली असली तरी नागरिकांच्या डोक्यावर कारवाईची टांगती तलवार कायम आहे. त्यामुळे ही घरांना कायमस्वरूपी संरक्षण मिळावे, यासाठी लढणार असल्याचे समितीने सांगितले.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५-५-१.

# भाईंदरमधील तरणतलावाच्या सुरक्षेचा प्रश्न वाऱ्यावर

**भाईंदर :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन, पाली परिसरात रिसॉर्टबरोबर खासगी बंगले पर्यटकांना उपलब्ध करून दिले जात आहेत. तेथील तरणतलावदेखील धोकादायक ठरू लागले आहेत. मागली वर्षी एका मुलीचा तरणतलावात बुडून मृत्यू झाला होता.

भाईंदर पश्चिम येथे उत्तन हा समुद्रकिनारा आणि घनदाट जंगलांनी वेढलेला निसर्गरम्य परिसर आहे. या ठिकाणी हॉटेल, रिसॉर्ट व खासगी बंगल्यांची निर्मिती झपाट्याने होत आहे. यात तरणतलावांची उपलब्धता हा पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. अनेक खासगी बंगलेधारक आपला बंगला भाड्यावर देऊ लागले आहेत. मात्र बंगला भाड्याने दिल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने घ्यावयाचे सर्व नियम हे दुर्लक्षित होत आहेत.

नियमानुसार तरणतलाव असलेल्या जागेत एक अथवा दोन सुरक्षारक्षक व जीवनरक्षक ठेवणे बंधनकारक आहे. मात्र या नियमाची अंमलबजावणी करण्याची सक्ती करण्यात येत नसल्याने येथील खासगी बंगलेधारक सर्रासपणे आपला व्यवसाय करत आहेत. परिणामी मागील दहा वर्षांत येथील तरणतलावांत बुडून मृत्यू पावलेल्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. मागील वर्षी २ एप्रिल रोजी उत्तन येथील बेकायदेशीर खासगी बंगल्यातील तरणतलावात बुडून सहा वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पालिकेने त्या अनधिकृत बंगल्यावर अतिक्रमणविरोधी कारवाई करून सर्व तरणतलावचालकांची तपासणी करणार असल्याचे जाहीर केले होते. परंतु आज त्या घटनेला एक वर्ष पूर्ण होत आले असतानादेखील पालिकेने तरणतलावांबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे तरणतलावांची सुरक्षा वाऱ्यावर सोडल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# मीरा-भाईंदरमध्ये पाणीटंचाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदरला होणारा पाणीपुरवठा गेल्या काही दिवसापासून विस्कळीत झाला असून शहरात पाणी टंचाईची समस्या उद्‌भवली आहे. दरम्यान शहराला दररोज २५ दक्ष लक्ष लिटर पाण्याची तूट भेडसावत असल्याचे पालिकेने सांगितले आहे.

महानगरपालिकेला स्टेम प्राधिकरणकडून ८६ दक्षलक्ष लिटर तर आणि एमआयडीसीकडून १३५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. मागील काही दिवसांपासून हा पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे शहरातील अनेक भागात पाणी टंचाईची समस्या तीव्र प्रमाणात जाणवू लागली आहे. मोठ्या गृह संकुलांना पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागते. भाजप पक्षाचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी आणि काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद सामंत यांनी आयुक्त दिलीप ढोले यांनी भेट घेतली. यावेळी प्रति दिवस २५ दशलक्ष लिटर पाण्याची तूट निर्माण होत असल्याचे स्पष्टीकरण आयुक्तांनी दिले असल्याचा त्यांनी केला.

> शहराला मंजूर, पाणीपुरवठ्यापैकी २५ दशलक्ष लिटर पाणी कमी येत असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. त्यावर उपाय काय करता येईल याकडे प्रशासन दुर्लक्ष करते. दोन दिवसात शहरातील पाणी सुरळीत न झाल्यास आम्ही जनआंदोलन करू.
> -नरेंद्र मेहता, माजी आमदार

> मागील आठवड्यात स्टेम आणि एमआयडीसीच्या जलवाहिनीचे काम केले जात होते. यात एमआयडीसीची जलवाहिनी फुटली होती. विभाग शासनाच्या अंतर्गत असून महापालिकेवर वितरणाची जबाबदारी आहे.
> -दिलीप ढोले, आयुक्त मीरा भाईंदर महानगरपालिका

> मीरा-भाईंदर शहराचे पाणी हे ठाण्याला वळवले जात आहे. त्यामुळे शहरात प्रति दिवस २५ ते ३० दशलक्ष लिटर पाण्याची तूट निर्माण होत आहे. भाजपचे सरकार नागरिकांना नवा पाणीकर आकारण्याचा घाट घालत आहे. त्यामुळे या विरोधात आम्ही आंदोलन करत आहोत.
> प्रमोद सामंत - काँग्रेस जिल्हा अध्यक्ष

Scanned with CamScanner


लोकसत्ता पु.पा.१.

# वसईमधील रिसॉर्ट पर्यटकांसाठी धोकादायक

**टिम लोकसत्ता, वसई**

**वसई :** उन्हाळ्याची सुट्टी लागल्याने नागरिकांची पावले आता वसई विरारमधील समुद्रकिनाऱ्यांवर असलेल्या रिसॉर्टकडे वळू लागली आहेत. वसई विरारसह मुंबई, ठाण्यातील पर्यटक या रिसॉर्टमध्ये येत असतात. मात्र रिसॉर्ट पर्यटकांसाठी धोकादायक ठरू लागले आहेत. तरणतलावात बुडून पर्यटकांचे मृत्यू होत आहेत. बहुतांश रिसॉर्ट हे बेकायदा असून या रिसॉर्टमध्ये बेकायदा मद्य विक्री होत आहे.

वसईच्या पश्चिम सागरी किनाऱ्यालगत असलेल्या वसई गाव, भुईगाव कळंब, राजोडी, अर्नाळा, वटार, रानगा, तसेच पूर्वेकडील भालिवली, तिल्हेर, वज्रेश्वरी, कौलार, मांडवी अशा भागांत अनेक रिसॉर्ट उभारण्यात आली आहेत. उन्हाळ्याची सुट्टी लागल्याने आता नागरिक मोठ्या संख्येने या रिसॉर्टमध्ये येत आहेत. मात्र पर्यटकांच्या सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याने रिसॉर्ट धोकादायक ठरत आहेत. बहुतांश रिसॉर्टमध्ये जीवरक्षक नसल्याची बाब समोर आली आहे. जरी असले तरी काही वेळा त्यांचे दुर्लक्ष होत असते. त्यामुळे तरणतलावात बुडून मृत्यू पावणाऱ्यांची संख्यादेखील वाढतच आहे. मागील चार महिन्यांत या रिसॉर्टमध्ये बुडून दोन जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे तरणतलावांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांकडून बैठका घेतल्या जात आहेत. त्यांनाही जीवरक्षक ठेवणे, योग्य ती काळजी घेणे, क्षमतेपेक्षा अधिक पर्यटक घेऊ नयेत अशा सूचना करण्यात येत असल्याचे अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी सांगितले. नागरिकांनीही सावधानता बाळगावी, जेणेकरून कोणतीही दुर्घटना होणार नाही, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



## मागील चार महिन्यांतील रिसॉर्टमधील दुर्घटना

- **७ एप्रिल २०२३**
कळंब येथील एका शीतल समुद्र मिनी गोवा रिसॉर्टच्या तरणतलावात बुडून चैतन्य कथायत या पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू.
- **२१ एप्रिल २०२३**
राजोडी येथील क्षितिज रिसॉर्टमध्ये लक्की पवार (१९) या तरुणाचा तरणतलावात बुडून मृत्यू.
- **२३ जानेवारी २०२३**
विरार पूर्वेच्या मांडवी रिसॉर्टच्या घसगुंडीत अडकून अंजना गाला (७२) या महिलेच्या अंगठ्याचे बोट तुटले.

## बेकायदा रिसॉर्ट, मद्य विक्री

या भागातील बहुतांश रिसॉर्ट बेकायदा असून पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून बांधण्यात आले आहेत. मात्र तरीदेखील त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. या रिसॉर्टमध्ये बेकायदेशीर मद्य पुरविण्यात येते. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून नुकतीच कारवाईदेखील करण्यात आली होती. वीकेंडला शहरातील रिसॉर्टमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. काही रिसॉर्टमध्ये क्षमतेपेक्षा अधिक पर्यटक घेतले जातात.

पुण्यनगरी पु.पा.४.

# जुगार खेळणाऱ्या १२ जणांना भाईदरमध्ये अटक



**। मीरा रोड :** भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील जय अंबे नगर येथील झोपडपट्टीत तीन पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्यावर भाईंदर पोलिसांनी कारवाई करून १२ जणांना अटक केली आहे. कारवाईवेळी १५ हजार ९३० रुपये जप्त करण्यात आले असून, त्यांच्याविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा भाईंदर शहरात जुगार, ऑनलाइन लॉटरी व गुटखा विक्री जोरात सुरू आहे. या बेकायदा धंद्यांनी डोके वर काढल्याने नागरिकांना मात्र मोठ्या प्रमाणात याचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत तक्रारी येऊ लागल्यानंतर पोलिसांनीही कारवाई करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे.

लॉटरी दुकानावर व जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई केल्याचे दिसत आहे. भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील जय अंबे नगर येथे मिठागराच्या जागेत पैसे लावून तीन पत्ता जुगार खेळला जात होता. याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी त्याठिकाणी धाड टाकून जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करून अटक केली आहे. त्यांच्याकडून १५ हजार ९३० रुपये रक्कम जप्त केली. ही कारवाई भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुटलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबर, पोलीस हवालदार किरण पवार, पोलीस शिपाई संजय चव्हाण, गजानन चव्हाण, पद्मिनी वाकोडे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पृ-५ता-१.

# पाण्यासाठी आणखी हाल

## वसई, विरारकरांना आता विभागवार पाणी मिळणार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून पुढील दीड ते दो महिने नागरिकांसाठी मोठा कसोटीचा काळ असणार आहे. पाण्याच्या टंचाईमुळे पालिकेने नियोजनासाठी शहराचे पाच विभाग (झोन) तयार केले असून विभागानुसार पाणी वितरण केले जाणार आहे. यामध्ये आठवड्यानुसार प्रत्येक विभागात दोन दिवस पाणी बंद ठेवण्यात येणार आहे. यामुळे इतर विभागांना पाणी जास्त दावाने मिळेल, असा दावा पालिकेने केला आहे.

सध्या वसई, विरार शहरात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाण्यासाठी ठिकठिकाणी नागरिकांसह विविध राजकीय पक्षांचे मोर्चे निघू लागले आहे. सूर्याचे अतिरिक्त पाणी अद्याप आले नसून वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे पुढील दीड ते दोन महिने ही टंचाई कायम राहणार आहे.

मात्र सध्या २३० दशलक्ष पाणीपुरवठा होत असून गळती होत आहे. १४२ दशलक्ष लिटर पाण्याची तूट भेडसावत आहे. त्यासाठी पालिकेने एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला होता. मात्र एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असला तरी तो कमी दाबाने मिळतो. त्यामुळे नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. एक दिवसाआड पाणीपुरवठा हा कागदोपत्री होता. प्रत्यक्षात दोन दिवसाआड पाणी दिले जात होते. त्यात गळती, जलवाहिन्या फुटणे अशा विविध कारणांमुळे पाणीपुरवठा खंडित व्हायचा आणि नागरिकांना प्रत्यक्षात १० ते १२ दिवस पाणी मिळत होते. आता विभागवार वितरणामुळे नागरिकांचे आणखी हाल होणार आहेत, असे सामाजिक कार्यकर्ते मनीष सामंत यांनी सांगितले.




### पाणी नियोजनासाठी पाच विभाग

पालिकेने आता वितरणाच्या नियोजनासाठी शहराचे पाच विभाग (झोन) तयार केले आहे. त्यानुसार आठवड्याचे वेळापत्रक तयार केले आहे. वसई–नायगाव, विरार पूर्व, विरार पश्चिम, नालासोपारा पूर्व आणि नालासोपारा पश्चिम असे हे ५ विभाग आहेत. प्रत्येक आठवड्याला यातील एका विभागात दोन दिवस पाणी बंद ठेवून अन्य विभागाला ते दिले जाणार आहे. यामुळे शहरात मोठी पाणीबाणी निर्माण होणार आहे. पालिकेने मात्र यामुळे जास्त दाबाने (प्रेशर) पाणीपुरवठा होईल, असे सांगितले आहे. याबाबत माहिती देताना पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सर्वांना एकत्र पाणी दिल्यास त्याचा दाब कमी होतो आणि पुरेसे पाणी मिळत नाही. विभागवार वितरण केल्याने नागरिकांना पुरेशा दाबाने जास्त पाणी मिळेल.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु.पा.१.

# करवाढ रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा

## प्रस्तावित करवाढीला काँग्रेसचा विरोध



**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेचा ऑगस्ट २०२२ मध्ये कालावधी संपल्यामुळे राज्य शासनाने प्रशासक म्हणून आयुक्त दिलीप ढोले यांची नियुक्ती केली आहे. आयुक्तांनी कोणत्याही प्रकारची करवाढ न करता अर्थसंकल्प सादर केला आहे. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आता नव्याने १० ते १५ टक्के पाणीपुरवठा लाभ कर, २३ ते ३० टक्के पाणीपट्टीत करवाढ, दीड टक्का अग्निशमन सेवा करवाढ, तसेच परिवहन सेवा बसभाड्यात वाढ, अशा प्रकारचे करवाढीचे प्रशासकीय निर्णय घेतले आहेत. त्यामुळे या प्रस्तावित करवाढीला भाजपपाठोपाठ काँग्रेसनेही विरोध केला आहे. जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, माजी गटनेते जुबेर इनामदार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांना निवेदन दिले आहे. प्रस्तावित करवाढ मागे न घेतल्यास काँग्रेसने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महापालिकेने छुप्या पद्धतीने अनेक करांत वाढ केली आहे. राज्यात शिवसेना (शिंदे गट) व भाजपचे सरकार सत्तेत असताना भाजपच्या माजी आमदार व विद्यमान आमदारांना करवाढीवर आंदोलन करण्याची वेळ येते, हे दुर्दैव असल्याची टीका सामंत यांनी केली. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी माजी आ. मुझफ्फर हुसैन यांच्या उपस्थितीत काँग्रेस शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेतली. तेव्हा सर्वसामान्य जनतेवर करवाढ लादली जाणार नाही. याची काळजी घेऊ, असे आश्वासन दिले होते, असे जिल्हा प्रवक्ता प्रकाश नागणे यांनी सांगितले.

उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना टार्गेट करू नका, अशा प्रकारचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले होते. त्यानंतर अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची करवाढ न करता अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. आता अचानक करवाढ का केली जात आहे? प्रशासकीय राजवट असताना सर्वांना विश्वासात घेऊन काम करणे अपेक्षित असताना आयुक्तांनी ज्या पद्धतीने करवाढ केली आहे, ती अयोग्य आहे. याबाबत सकारात्मक विचार करून करवाढीचा निर्णय रद्द करून सर्वसामान्य करदात्या नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा जनहितार्थ काँग्रेसला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे. या वेळी माजी नगरसेविका मर्लिन डीसा, रुबिना शेख, गीता परदेशी यांसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढारी पु.पा.३.

# टास्क खेळण्यास सांगून फसवणूक

**मिरारोड :** मिरारोड येथे राहणाऱ्या तरुणाला टास्क खेळण्यास सांगून त्याद्वारे जादा नफा देण्याचे आमिष दाखवून ८५ हजाराची फसवणूक केली आहे. मिरारोड येथे राहणाऱ्या विष्णू तान्त्रिकल (२९) याला राधीका हीने त्याच्या मोबाईलवर अर्धवेळ नोकरी बाबत मेसेज केला. त्यावेळी त्या तरुणाने काम करण्यास होकार दिला. त्यानंतर त्यांनी विष्णू याला टेलग्रामवर जॉईन केले.

टास्क पूर्ण केले तर तुम्हाला रक्कम मिळेल असे सांगितले. विष्णू याने काही टास्क पूर्ण केले त्यावेळी त्याला काही रक्कम देण्यात आली. अशाप्रकारे वेगवेगळे टास्क देऊन तुम्ही रक्कम जिंकली आहे असे सांगून ६० हजार भरले तर तुम्हाला १४२५०० रुपये मिळतील असे सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नयानगर पोलीस करत आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ३.

# माजी नगरसेवकाच्या घरात चोरी करणाऱ्याला अटक

## ७४ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त



मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

मिरारोड भागातील काँग्रेसचे माजी नगरसेवक राजीव ओमप्रकाश मेहरा यांच्या घरात घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा, कक्ष १ (काशिमिरा युनिट)च्या पथकाने १२ तासात अटक करून ७४ लाख ६२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिरारोड, शितलनगर परिसरातील काँग्रेसचे माजी नगरसेवक राजीव ओमप्रकाश मेहरा हे २४ एप्रिल रोजी त्यांचे कामानिमीत्त बाहेर गेले होते. त्यांचे घर बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचा टेरेसचा दरवाजा कापून आतमध्ये प्रवेश करून, कपाटाचा दरवाजा तोडून कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम रुपये ७० लाख व सोने-चांदीचे दागिणे असा एकूण ७०,१२,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी चोरी करून नेल्याबाबत मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्यासाठी अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिराचे पोनि अविराज कुराडे, अधिकारी व अंमलदारांनी तपास करून आरोपी संजीवकुमार सदानंद सिंह यास २५ एप्रिल रोजी अटक केली व त्याच्याकडून घरफोडी केलेले एकूण रुपये ७४ लाख ५० हजार व १२ हजारांचे दागिने जप्त केले आहेत.

पुढारी पु. पा. ४.

# टीसीच्या नोकरीचे आमिष

## बेरोजगाराची १२ लाखांची फसवणूक

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

रेल्वेत टी. सी. ची नोकरी लावून देतो असे सांगत तरुणाची १२ लाख ४० हजार रुपयांची ऑनलाईन व रोख रक्कम घेऊन या भामट्यांनी तरुणाचे , बनावट कागदपत्रे तयार करून जॉइनिंग लेटर व ओळखपत्र देऊन फसवणूक केल्या प्रकरणी पाच जणांविरुद्ध काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिमिरा पोलीस ठाण्यासमोर असलेल्या सनराईज हॉटेलमध्ये बसून कांदिवली येथे राहणाऱ्या भरत नारायण झा ( २८ ) या बेरोजगार तरुणाला सप्टेंबर २०१८ ला भारतीय रेल्वेत टी. सी. (तिकीट चेकर ) पदी कोणतीही परीक्षा न देता थेट नोकरी देण्याचे सांगून पाच जणांनी फसवणूक केली आहे. काशिमिरा येथील मुंसी कंपाऊंड येथे राहणाऱ्या समीर कादरी याने भरत याला रेल्वेत नोकरी लावण्याचे सांगून त्याबदल्यात १० लाख रुपये लागतील असे सांगून टोकन रक्कम म्हणून दिड लाख रुपये घेतले. त्यानंतर समीर याने भरत याला मेडिकल चेकअप करण्यासाठी लखनऊ येथील बादशाह नगर रेल्वे मेडिकल सेंटर मध्ये खान यांच्याकडे पाठवून दिले. त्याचे मेडिकल चेकअप करण्यात आले. त्यानंतर भरत याला मेडिकल मध्ये फिट असून बाकी पैशाची तडजोड करण्यास सांगितले. त्यानंतर भरत झा व त्यांच्या वडिलांनी दोन लाख रुपये रोख दिले. त्यावेळी समीर याने पुढील ५ ते ६ दिवसात जॉइनिंग लेटर मिळेल असे सांगितले. त्यानंतर भरत याला अनेक वेळा उत्तरप्रदेश व दिल्ली येथे पाठवून नोकरीचे फॉर्म व हाताचे अंगठे व सही घेऊन बनावट ओळखपत्र बनवुन देऊन एक महिण्यात जॉईनिंग होईल असे सांगितले. त्यानंतर त्या तरुणाला उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे टेलर कडे नेऊन टि. सी. चे कपडे पॅन्ट, शर्ट व कोटही शिवून घेण्यास सांगून जॉइनिंग प्रोसेस मध्ये असून लवकरच आदेश मिळतील असे सांगितले. तेंव्हापासून वेगवेगळ्या कारणे सांगत बँक अकाउंट व रोख रक्कम आणि गुगल-पे द्वारे पैसे घेऊन फसवणूक केली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.३०

# वसई शहराला समस्यांचा विळखा

## ठाकरे गटाचा महानगरपालिकेवर धडक मोर्चा



**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयावर मंगळवारी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला. २०० बेडचे सुसज्ज रुग्णालय व शहरात गेल्या महिना भरापासून होणारा अनियमित पाणीपुरवठा, फेरीवाल्यांचे वाढते अतिक्रमणाची समस्यांवर हा मोर्चा काढण्यात आला होता..

कोणतीही पूर्वकल्पना किंवा परवानगी न घेता या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते त्यामुळे विरार पोलिसांची या मोर्चेकरांना नियंत्रणात आणण्यासाठी चांगलीच धावपळ उडाली होती..मोर्चेकरी पालिकेतील अधिकाऱ्यांना घेराव घालणार होते अखेर पोलिसांनी या मोर्चेकरांना बॅरिकेट लावून अडवले व परिस्थिती नियंत्रणात आणली...यावेळी संतप्त शिवसैनिकांनी एन उन्हाळ्यात शहरातील पाण्याच्या समस्येवरून पालिकेच्या ढिसाळ कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली..त्यानंतर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने पालिका आयुक्ताची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

जलवाहिनी जोडणी असूनही सामान्य नागरिकांना होत नसलेला सुनियोजित पाणीपुरवठा, पैसे भरूनही मिळत नसलेल्या जलजोडण्या, पालिकेच्या शाळा उपलब्ध नसतानाही पालिका वसूल करत असलेला शिक्षण कर, आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, शहरात होत असलेली वाहतूक कोंडी, जाहिरात धोरण नसल्याने अनधिकृत बॅनर, फलक आणि होर्डिंग यामुळे शहराचे होत असलेले विद्रुपीकरण, फेरीवाला धोरणाअभावी शहरात वाढत असलेले फेरीवाले आणि त्यांच्याकडून होत असलेली बेकायदा हफ्ता वसुली, पालिकेच्या आरक्षित जागांवर झालेले अतिक्रमण, आरक्षित जागांचे पालिकेकडे होत नसलेले हस्तांतरण, नालेसफाई-गटारसफाई योग्य पद्धतीने व वेळत होत नसल्याने वसई-विरार शहरात दरवर्षी उद्भवत असलेली पूरस्थिती यासोबतच प्रशासकीय काळात पालिकेच्या विविध विभागांत बोकाळलेला अनिर्बंध भ्रष्टाचार याबाबत आपल्यासोबत मोर्चादरम्यान ऊहापोह करण्यात आला होता.

तब्बल चार महिन्यांचा कालावधी उलटूनही यातील बहुतांश समस्यांबाबत महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्यानेच या ठिय्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी दिली.

Scanned with CamScanner